**दिनांक : २६ - ३ - २३**

**विषय : तीन विकसकांची निवड.**

ठरल्या प्रमाणे दिनांक २४/३/२३ रोजी पंच समिती सदस्यांची मीटिंग, आपले पुनर्निर्माण प्रकल्प सल्लागार श्री हर्षल कवडिकर आणि विधी सल्लागार अड. किरण काबरा यांच्या सोबत सल्लागारांच्या ऑफिस इथे झाली.

विषय होता ७ वरून ३ विकसकांची निवड नक्की करणे.
ह्या संबंधात १४ आणि १५ तारखेला PYC इथे झालेल्या सादरीकरणा नंतर पंच समिती सदस्य आणि १६ आमंत्रित सभासद यांनी त्यांचे मत सचिव श्री पटवर्धन यांच्या कडे २० मार्च लाच दिले होते. तसेच सल्लागारांनी स्वतंत्र पणे, आवश्यक ती पडताळणी करून, त्यांचा कल काय आहे हे सांगायचे होते. त्या प्रमाणे सल्लागारांनी खालील तीन बिल्डर्स ची नावं पक्की करण्या ची शिफारस केली. सुदैवाने पंच समिती आणि आमंत्रित सभासदांच्या बहुमता चा कल ही त्याच प्रमाणे होता.

१. शुभम डेव्हलपर्स (न्याती ग्रुप सोबत)
२. मेजिस्टिक लेंडमार्कस
३. कोहिनूर इंटरप्राईज

ह्या मीटिंग चे वैशिष्ट हे होते की आपल्या सल्लागारांनी ह्या तीन बिल्डर्स च्या निवडी आधी आपली फिजिबिलिटी रिपोर्ट, पहिले आलेले सगळे प्राथमिक ऑफर्स, आपली Project Brief with Specifications, Wish List & Amenities आणि PYC इथे झालेले विकसकांचे सादरीकरण सारख्या सगळ्या बाबींचा एकदा परत सखोल आढावा घेतला. आपल्या फर्म अश्या अपेक्षा आणि झालेल्या ७ सादरीकरणात त्या अनुषंगाने विकसकांनी दिलेल्या ऑफर्स ह्याचा ही सखोल विचार केला आणि हा सगळा अभ्यास त्यांनी सदर मीटिंग मधे पंच समिती समोर PPT Presentation च्या माध्यमातून मांडला. निवडलेले तीन बिल्डर्स अश्या सगळ्या प्रक्रिये नंतर निवडण्यात आले असे स्पष्ट केले.

आपले अध्यक्ष आणि सचिव या दोघांनी सल्लागारांनी घेतलेल्या कष्टां साठी त्यांना धन्यवाद दिले.

मीटिंग मधे असेही ठरवण्यात आले की हा सर्व अभ्यास आणि तीन बिल्डर्स ची निवड प्रक्रिया लवकरच आपल्या सोसायटीतील सर्व सभासद आणि त्यांच्या

कुटुंबीयांना एक मेळावा घेऊन त्यात समझाउन सांगावी. ह्या मेळाव्याची तारीख नंतर ठरविण्यात येईल.

ह्या मेळावा आधी आपले सल्लागार आपण निवडलेले तीन विकसक, त्याचे पार्टनर, कनसोरशियम असल्यास प्रत्येक पार्टनर ची सखोल माहिती आणि आपल्या प्रोजेक्ट मधे त्याची जिम्मेदारी सारख्या प्रश्नाची माहिती काढतील जेणे करून नंतर कुठल्याही शंके ला जागा नको.

आपले सचिव श्री पटवर्धन यांनी सल्लागारांचे आभार मानून मीटिंग संपल्याचे जाहीर केले.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती च्या वती ने**